15 JAN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्यावतीने डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त शुक्रवार, दि.१६ रोजी प्रा. एन. डी. पाटील : विचारविश्व आणि प्रबोधन या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याख्यानामध्ये प्रसाद कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. मराठी विभागात सकाळी ११ वाजता व्याख्यान सुरू होणार आहे. व्याख्यानासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन समन्वायक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष

1 5 JAN 2026 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात उद्या व्याख्यान

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाच्या वतीने डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवार, दि. १६ रोजी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

'प्रा. एन. डी. पाटील : विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर प्रसाद कुलकर्णी (इचलकरंजी) मांडणी करणार आहेत. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. सकाळी ११ वाजता व्याख्यान होणार आहे.

15 JAN 2026
सकाळ

# विद्यापीठात उद्या 'प्रा. एन. डी. पाटील : विचारविश्व' व्याख्यान

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनातर्फे डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृती दिनानिमित्त शुक्रवारी (ता. १६) सकाळी अकरा वाजता 'प्रा. एन. डी. पाटील: विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर व्याख्यान होणार आहे. त्यामध्ये इचलकरंजी येथील प्रसाद कुलकर्णी मांडणी करणार आहेत. मराठी अधिविभागातील या व्याख्यानाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असतील. व्याख्यानासाठी विद्यार्थी, नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले.

15 JAN 2026
सकाळ

# विद्यार्थ्यांनी भरपूर वाचन करावे : डॉ. शिंदे

**कोतोली :** 'आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी मोबाईलचा मर्यादित व योग्य वापर करून अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे. शिस्त, सातत्य आणि परिश्रम यांच्या जोरावरच यश प्राप्त करता येते. भरपूर वाचन करावे आणि त्यातून जेवढे चांगले आहे तेवढे तुम्ही घेतले तर तुमचे आचार, विचार नक्की बदलतील,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. कोतोली (ता. पन्हाळा) येथील श्रीपतराव चौगुले कॉलेजच्या २५ व्या वार्षिक स्नेहसंमेलन आणि पारितोषिक वितरण कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष डॉ. के. एस. चौगुले होते. प्राचार्य डॉ. विजयकुमार पाटील यांनी संस्थेच्या कार्याची ओळख करून दिली. सचिव शिवाजीराव पाटील यांनी अहवाल वाचन केले. यावेळी गुणवंत विद्यार्थी आणि स्पर्धा परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी 'ज्ञानामृत वाटचाल पंचवीस वर्षांची' या अंकाचा प्रकाशन सोहळा झाला. स्त्रीशक्तीचा जागर या संकल्पनेवर गीत, संगीत, नृत्याविष्कार व नाट्याद्वारे उलगडून दाखवणाऱ्या विविध गुणदर्शनाने स्नेहसंमेलन सादर करण्यात आले. प्रा. रवींद्र चोगुले यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. ए. आर. महाजन यांनी आभार मानले.

15 JAN 2026

लोकमत

# नदी हाच माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू : बोरगावकर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** नदी हा माझ्या लेखनाचा केंद्रबिंदू आहे, असे प्रतिपादन 'नदिष्ट' या सुप्रसिद्ध कादंबरीचे लेखक मनोज बोरगावकर यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'लेखक मुक्तसंवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे अध्यक्षस्थानी होते.

बोरगावकर म्हणाले, गोदामायने व तिथल्या निसर्गाने मला लिहिण्याची प्रेरणा दिली. माझ्या कादंबरीतील घटना या प्रत्यक्ष जीवनाशी निगडित आहेत. डॉ. शिंदे म्हणाले, 'नदिष्ट'मध्ये मातृत्वाचे एक रूप आणि दुसरे जीवनाचे रूपक आढळते. विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. यावेळी प्रा. नंदकुमार मोरे, प्राचार्य आर.. जी. कुलकर्णी, कृष्णा दिवटे, सुषमा शितोळे, डॉ. कृष्णात पाटील, डॉ. केदार मारुलकर, प्रा. जयसिंग सावंत, अनिल साबळे उपस्थित होते.

15 JAN 2026

लोकमत

# क्विक Update

## मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळा

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाने आयोजित केलेल्या पाच दिवसीय मोडी लिपी प्रशिक्षण कार्यशाळेत ५५ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ४० विद्यार्थ्यांनी ही कार्यशाळा यशस्वीरीत्या पूर्ण केली.शिवाजी विद्यापीठात दि. ५ ते ९ जानेवारी या कालावधीत प्रधानमंत्री उच्चस्तर शिक्षा अभियानाच्या अंतर्गत मोडी लिपी प्रशिक्षण ही कार्यशाळा झाली. पाच दिवस तीस तासांच्या या कार्यशाळेस डॉ. तानाजी हवालदार यांनी 'मराठा कालखंड आणि मोडी कागदपत्रे', मोडी तज्ज्ञ मच्छिंद्र चौधरी यांनी 'मोडीची ओळख व त्याचे प्रत्यक्ष उपयोजन आणि मोडी कागदपत्राचे प्रकार', मोडी तज्ज्ञ पांडुरंग आंबले यांनी 'मोडी कालगणना व मराठेकालीन कालगणनेचे संशोधकीय उपयोजन' या विषयावर, साहाय्यक प्राध्यापक चंद्रशेखर काटे यांनी 'मोडी दस्तावेजांची लेखा शैली व गणितीय उजळणी' या विषयावर, डॉ. पूनम भुयेकर यांनी मार्गदर्शन केले.

15 JAN 2026
लोकमत

# सुगम संगीत स्पर्धेत कोल्हापूर केंद्राच्या देवल क्लबची बाजी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : राज्यात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या मुंबईच्या दादर माटुंगा कल्चरल सेंटरतर्फे आयोजित राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन सुगम संगीत स्पर्धेत कोल्हापूर केंद्राच्या देवल क्लबने बाजी मारली. स्पर्धेच्या अंतिम फेरीत विविध शहरातील केंद्रांमधून निवडलेले २१ स्पर्धक सहभागी झाले होते.

या स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या स्वप्निल कोकाळे याने प्रथम क्रमांक, सन्मान चिन्ह आणि गुणगौरव पारितोषिक रुपये १० हजार, गडहिंग्लजच्या साधना महाविद्यालयाच्या रसिका हिडदुग्गी हिने द्वितीय क्रमांक, सन्मान चिन्ह, गुणगौरव आणि रु. ७००० रुपये पारितोषिक तर कोल्हापूर हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या केतकी महेश हिरेमठ हिने तृतीय क्रमांक, सन्मान चिन्ह, गुणगौरव आणि ५००० रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. स्पर्धेच्या प्राथमिक फेरीत सर्वोत्तम ठरलेल्या केतकी हिरेमठचा १००० रुपयांचे विशेष पारितोषिक देउन गौरव करण्यात आला. गायिका माधुरी करमरकर, गीतकार मिलिंद जोशी आणि आनंद नंदे यांनी परीक्षण केले. पारितोषिक वितरण समारंभास दादर माटुंगा कल्चरल सेंटरचे कार्यवाह रवींद्र आवटी, उषा पोतनीस, विनिता काळे उपस्थित होत्या.


15 JAN 2026
पुण्यनगरी

# विद्यापीठात उद्या व्याख्यानाचे आयोजन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनातर्फे डॉ. एन. डी. पाटील यांच्या स्मृतिदिनानिमित्त शुक्रवार, दि. १६ जानेवारी रोजी 'प्रा. एन. डी. पाटील : विचारविश्व आणि प्रबोधन' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रसाद कुलकर्णी मांडणी करणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे असणार आहेत. हा कार्यक्रम विद्यापीठातील मराठी विभागात सकाळी ११ वाजता होणार आहे, अशी माहिती डॉ. एन. डी. पाटील लोकचळवळ अध्यासनाचे समन्मयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

15 JAN 2026

जनप्रवास



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना प्रा. श्यामसुंदर मिरजकर. सोबत डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रणधीर शिंदे.

# कवितेमुळे माणूस म्हणून विचार करता येतो

## प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांचे मत

**जनप्रवास : कोल्हापूर**

कविता ही मानवतेची सर्वात सुंदर परिभाषा आहे. कविता स्वतःकडे दुसऱ्याच्या नजरेने पाहायला शिकवते. कविता केवळ शब्दांचा खेळ नसतो, तर घटना आणि अनुभूतीला संवेदनशीलतेची जोड मिळाल्याने उत्तम कवितेची निर्मिती होते. कवितेमुळे समाजात जगताना माणूस म्हणून विचार करता येतो, असे मत प्रा. श्यामसुंदर मिरजकर यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग येथे 'लेखक संवाद' या कार्यक्रमात बोलत होते. प्रमुख उपस्थितीत प्रा. नंदकुमार मोरे होते.

मिरजकर म्हणाले, कवीची प्रगती जाती-धर्माच्या भिंतीत होत नाही. त्यासाठी त्याला सामाजिक व्हावे लागते. हा विकास वाचनातून होतो. वाचन हे अंधारून आलेल्या काळात उजेडासारखे असते. फुलून येणाऱ्या क्षणांची सोबत असते. हे सर्व कवितेमुळे लक्षात येते. खरे तर जीवनाचा तोल सांभाळण्याचे काम कविता करते. यावेळी त्यांनी 'इचलकरंजी कविता', 'दुखणं' व 'एक सेल्फी मित्रासोबत' या कविता सादर केल्या. मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. भक्ती नाईक यांनी सूत्रसंचालन केले. ऋणाली नांद्रेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सुखदेव एकल, संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 JAN 2026 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात मंगळवारपासून 'शिक्षण-उद्योग-शासन' परिषद

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची माहिती

कोल्हापूर, ता. १४ : नवोपक्रम, स्टार्टअप्सना बळ देऊन विकसित भारत २०४७ ध्येय साध्य करण्यासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे मंगळवारी (ता. २०) आणि बुधवारी (ता. २१) आंतरराष्ट्रीय 'शिक्षण-उद्योग-शासन' परिषद होणार आहे. त्यात शास्त्रज्ञ, उद्योजक, शासनाचे प्रतिनिधी मार्गदर्शन करणार असल्याची माहिती प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

नवोन्मेष, उदयोन्मुख तंत्रज्ञान, संशोधन-उद्योग सहकार्य, स्टार्टअप्स या विषयांवर आंतरराष्ट्रीय परिषदेत भर दिला आहे. महिला उद्योजकांच्या यशोगाथा सादर करण्यासाठी विशेष सत्र होणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले. परिषदेचे उद्घाटन मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजता मनोरमा इन्फो सोल्युशन्सच्या संस्थापक अश्विनी दानिगोंड, प्रा. कंदलम रामानुजाचार्य (अमेरिका), डॉ. चंद्रिका कौशिक (दिल्ली) यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असतील. परिषदेच्या दोन दिवसांत प्रा. डॉ. मोहम्मद याझीद बिन, महेश सूर्यवंशी, डॉ. अहमद इलियास बिन, गिरीश चितळे, डॉ. विनायक पारळे, देवव्रत हर्षे, सचिन कुंभोजे, योगेश कुलकर्णी, आरती भोसले, जयदीप चॅटर्जी, पराग काळकर, रमेश चव्हाण, नितीन वाडीकर मार्गदर्शन करणार असल्याचे डॉ. सागर डेळेकर यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, एम. एस. देशमुख, के. एम. गरडकर, सुभाष माने, आलोक जत्राटकर उपस्थित होते.

### पंधरा लाखांपर्यंत बीज भांडवल मिळणार

■ या परिषदेत व्यावसायिक मार्गदर्शन सत्रे, नवोन्मेषक-गुंतवणूकदार बैठक, नवोन्मेष संशोधन-पेटंट सादरीकरण, 'शार्क टँक' पिचिंग स्पर्धा, पेटंट गॅलरी, स्टार्टअप्सचे स्टॉल्स, नावीन्यपूर्ण उत्पादने व तंत्रज्ञानाचे प्रदर्शन, पोस्टर स्पर्धा होणार आहेत. या विविध स्पर्धेतील विजेत्यांना एकूण पंधरा लाख रुपयांपर्यंत बीज निधी भांडवल म्हणून दिले जाणार असल्याचे डॉ. जाधव यांनी सांगितले.

15 JAN 2026
जनप्रवास
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात २० जानेवारीपासून परिषद

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. सागर डेळेकर यांची माहिती

**जनप्रवास : कोल्हापूर**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने २० व २१ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद २.० चे आयोजन केले आहे. याचे उद्‌घाटन मनोरा इन्फो-सॉल्यूशन्स प्रा. लि.च्या संस्थापक अश्विनी दानिगोंड यांच्या हस्ते होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून म्हणून अमेरिकेतील प्रा. कंदलम रामानुजाचार्य आणि दिल्लीतील डॉ. चंद्रिका कौशिक यांची विशेष उपस्थिती असेल. अध्यक्षस्थान प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी भूषविणार आहेत, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि डॉ. सागर डेळेकर यांनी दिली.

प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. जाधव म्हणाल्या, शिक्षण, उद्योग आणि शासन यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करून



नवोपक्रम आणि स्टार्टअप्स यांना बळ देऊन विकसित भारत - २०४७ हा आहे. या परिषदेत आंतरराष्ट्रीय, शास्त्रज्ञ, उद्योगपती आणि शासनाचे प्रतिनिधी यांची व्याख्याने आयोजित केली आहेत. नवोन्मेष, उदयोन्मुख तंत्रज्ञान आणि संशोधन-उद्योग सहकार्य आणि स्टार्टअप्स या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. या परिषदेत स्टार्टअप प्रदर्शन, पोस्टर स्पर्धा आणि इनोव्हेशन हॅकथॉनचे आयोजन केले आहे. विद्यार्थी, संशोधक आणि स्टार्टअप्सना नाविन्यपूर्ण कल्पना व उपक्रम सादर करण्याची संधी मिळणार आहे.

परिषदेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ डॉ. मोहम्मद याझीद बिन (मलेशिया), डॉ. महेश सूर्यवंशी (ऑस्ट्रेलिया) आणि डॉ. अहमद इलियास बिन (मलेशिया), गिरीश चितळे (चितळे उद्योग समुह), डॉ. विनायक पारळे (जपान), डॉ. देवव्रत हर्षे (डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ), सचिन कुंभोजे (सहसंचालक CIREE), योगेश कुलकर्णी (संचालक, Global Finance Professionals), आरती भोसले (Green Solutions Pune), जयदीप चॅटर्जी (ESG Program Director, Cummins India Pune), प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर (पुणे विद्यापीठ), रमेश चव्हाण (Kirloskar Oil Engines), नितीन वाडीकर (Chairman, Maharashtra Engineering) मार्गदर्शन करणार आहेत. देश-विदेशातून सुमारे ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. निवडक स्टार्टअप कल्पनांना एकूण १५ लाख रुपयांचे बीज भांडवल प्रदान करण्यात येणार आहे. या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी सर्व विद्यार्थी, संशोधक, उद्योगपती, स्टार्टअप्स तसेच नवोन्मेषात रुची असलेल्या नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. सुभाष माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
15 JAN 2026 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद

## प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव यांची माहिती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे दि. २० व २१ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद २.० चे आयोजन केले आहे. या दोन दिवसीय परिषदेचा मुख्य उद्देश शिक्षण, उद्योग व शासन यांच्यातील सहकार्य अधिक दृढ करून नवोपक्रम व स्टार्टअप्सना बळ देऊन विकसित भारत-२०४७ हे ध्येय साध्य करणे हा आहे, अशी माहिती प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यात आंतरराष्ट्रीय, शास्त्रज्ञ, उद्योगपती व शासन प्रतिनिधींची व्याख्याने आयोजित केली आहेत. उद्घाटनास प्रमुख पाहुणे मनोरा इन्फो-सॉल्युशन्सच्या संस्थापक अश्विनी दानिगोंड असून, पाहुणे म्हणून प्रा. कंदलम रामानुजाचार्य (अमेरिका) व डॉ. चंद्रिका कौशिक (दिल्ली) विशेष उपस्थित असतील. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी असतील. परिषदेस प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव उपस्थित राहणार आहेत. परिषदेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील शास्त्रज्ञ डॉ. मोहम्मद याझीद बिन (मलेशिया), डॉ. महेश सूर्यवंशी (ऑस्ट्रेलिया) व डॉ. अहमद इलियास बिन (मलेशिया), गिरीश चितळे (चितळे उद्योग समूह), डॉ. विनायक पारळे (जपान), डॉ. देवव्रत हर्षे (डॉ. डी. वाय. पी. विद्यापीठ), सचिन कुंभोजे, योगेश कुलकर्णी, आरती भोसले, जयदीप चॅटर्जी, पुणे विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर, रमेश चव्हाण, महाराष्ट्र इंजिनिअरिंगचे चेअरमन नितीन वाडीकर अनुभव व विचार मांडतील. परिषदेत देश-विदेशातून सुमारे ३०० पेक्षा अधिक प्रतिनिधी सहभागी होताल. पत्रकार परिषदेस कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. महादेव देशमुख, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. सुभाष माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

1 5 JAN 2026

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात शिक्षण-उद्योग-शासन परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे सोमवार, दि. २० आणि मंगळवार, दि. २१ जानेवारी रोजी आंतरराष्ट्रीय शिक्षण-उद्योग-शासन परिषद २.० चे आयोजन केले आहे. या दोनदिवसीय परिषदेत देश-विदेशातून ३०० हून अधिक प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. यामध्ये अभ्यासक, संशोधक, उद्योगतज्ज्ञ, उद्योजक यांचा समावेश असेल, अशी माहिती बुधवारी प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी दिली. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. सुभाष माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.

यात महिला उद्योजकांच्या यशोगाथांचे विशेष सत्र असून स्टार्टअप प्रदर्शन, पोस्टर स्पर्धा आणि इनोव्हेशन हॅकाथॉनचेही आयोजन केलेले आहे. विद्यार्थी, संशोधक आणि स्टार्टअप्सना नावीन्यपूर्ण कल्पना व स्पर्धेतील विजेते आणि उद्योजकांना पंधरा लाख बीज निधी भांडवल म्हणून मिळणार आहे.

15 JAN 2026

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय शिक्षण, उद्योग, शासन परिषद

- २०-२१ जानेवारीस आयोजन

- देशविदेशातील ३०० प्रतिनिधींचा सहभाग

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवार दि. २० व २१ रोजी आंतरराष्ट्रीय शिक्षण–उद्योग–शासन परिषद २.० चे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रभारी प्र–कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व समन्वयक डॉ. सागर डेळेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. जाधव म्हणाल्या, शिक्षण, उद्योग व शासन यांच्यातील सहकार्य दृढ करून नवोपक्रम व स्टार्टअप्सना बळ देण्यासह विकसित भारत २०४७ चे ध्येय साध्य करण्याच्या उद्देषाने परिषदेचे आयोजन केले आहे. या परिषदेत आंतरराष्ट्रीय, शास्त्रज्ञ, उद्योगपती व शासनाचे प्रतिनिधी यांचे मार्गदर्शन होणार आहे. परिषदेचे उद्‌घाटन मनोरा इन्फो सॉल्यूशन्सचे संस्थापक अश्विनी दानिगोंड यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी अमेरिकेतील प्रा. कंदलम रामानुजाचार्य व दिल्लीचे डॉ. चंद्रिका कौशिक यांची प्रमुख उपस्थिती आहे. अध्यक्षस्थानी प्रभारी कुलगुरू प्रा. डॉ. सुरेश गोसावी असतील. या परिषदेसाठी देशविदेशातून ३०० हून अधिक प्रतिनिधींचा सहभाग असेल.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मानव्यशास्त्र विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. कल्याणराव गरडकर, डॉ. सुभाष माने, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते.